अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचे कार्यालय, ९१
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०० ०३०
दुरध्वनी क्र. २४९२१२१२, २४९२२६१८
E-mail addlcpacbmumbai@mahapolice,gov.in
दिनांक :- ११/१२/२०२५

## -: प्रेसनोट :-

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गु.र.क्र | ३८/२०२५ |
| कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी लोकसेविका | निकीता विजय राठोड, ३६ वर्षे, पद- वरिष्ठ लिपिक, निकाल कक्ष, छत्रपती शिवाजी महाराज भवन, मुंबई विद्यापीठ, मुंबई |
| लाचेची मागणी | रूपये ५५,०००/- तडजोडीअंती रू. १०,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रुपये १०,०००/- |
| हस्तगत लाचेची रक्कम | रुपये १०,०००/- |
| थोडक्यात हकीगत | यातील तक्रारदार यांचे मुंबई विद्यापीठ येथील बी.कॉम. या पदवीचे अंतिम वर्षातील परिक्षा निकालाचे मार्कलिस्ट देणेकरीता लोकसेविका निकीता विजय राठोड, वरिष्ठ लिपीक यांनी तक्रारदार यांचेकडे जुलै २०२५ मध्ये रू. ५५,०००/- लाचेची मागणी केली होती. त्यानुसार तक्रारदार दिनांक १८/११/२०२५ रोजी लोकसेविका यांनी रू. १५,०००/- लाच दिली होती. परंतू लोकसेविका यांनी उर्वरीत लाचेच्या रक्कमेकरीता तक्रारदार यांचेकडे तगादा लावला होता. दिनांक १०/१२/२०२५ रोजी तक्रारदार यांनी लोकसेविका यांची भेट घेतली असता, लोकसेवका यांनी तक्रारदार यांना त्यांचे मार्कलिस्ट देण्याकरीता तडजोड करून रू. १५,०००/- दयावे लागतील असे सांगून लाचेची मागणी केली. परंतू तक्रारदार यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १०/१२/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे समक्ष हजर राहून तक्रार दिली.<br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १०/१२/२०२५ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेविका यांनी तक्रारदार यांना मार्कलिस्ट देण्याकरीता तडजोडीअंती रूपये १०,०००/- लाचेची मागणी करून स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार तात्काळ करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेविका निकीता विजय राठोड, वरिष्ठ लिपीक, यांना तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम रू. १०,०००/- स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. म्हणुन त्यांच्याविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**सापळा अधिकारी :- श्रीमती रेखा काळे, पोलीस निरीक्षक** **पर्यवेक्षक अधिकारी:- श्री. हरिदास किल्लेदार, सहाय्यक पोलीस आयुक्त**

मार्गदर्शक अधिकारी- श्री. संदिप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( अजित सुळे )
सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अथवा त्यांचे मार्फत त्यांच्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :- **लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**टोलफ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८**
**व्हॉट्सअप क्र. :- 8828241064** **मोबाईल ॲप :- www.acbmaharashtra.net**
**वेबसाईट :- acbmaharashtra.gov.in, acbwebmail@mahapolice.gov.in**
**ईमेल :- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**
**फेसबुक :- www.facebook.com - Maharashtra ACB**